नियमित दिवाणी दावा क्र.५०७/२०१८
नि.क्र.२४/ क (सोबत)

वादीतर्फे सा.क्र.१ हजर

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

११. मी प्रतिवादी क्र.३ चे वडील वसंतराव सुरवसे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावातील खरेदी विक्रीचे जास्तीत जास्त व्यवहार १००/- च्या बॉन्डवर होतात. शेख लाला हमीदसाब हा बॉन्ड रायटर आहे, याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीमधील पुर्व बाजुच्या ३३ बाय ३३ फुटावर दि.०६/०७/२००४ पासून प्रतिवादी क्र.३ काबीज आहे. मधुकर व बापू यांनी सदर जमिनीवर अडथळा करु नये म्हणून दिवाणी दावा क्र.२६८/१४ दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मी तिऱ्हाईत पक्षकार म्हणून हजर होण्यासाठी अर्ज दिला होता, परंतु तो नामंजूर झाला होता. सदर दाव्यामध्ये न्यायालयाने मधुकर व बापूविरुध्द तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर व बापू हे व्यंकटपेक्षा माझे जास्त जवळचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मधुकर व बापू यांनीही मनाई हुकूमाकरीता अर्ज दाखल केला होता व तो नामंजूर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर व बापू यांच्या सांगण्यावरुन मी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्यंकटकडून जमिनीचा ताबा मागण्याचा माझा संबंध नाही. मधुकरने पाच रुपयाच्या बॉन्डवर माझ्याकडून स्टॅम्प लिहून घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी मधुकर व बापू यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा ताबा मागत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.07.04 17:10:32 +0530

दि.०४/०७/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.